# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| ०१ | ई – निविदा मसुदा /वृत्तपत्रात द्यावयाची जाहिरात | ०३-०४ |
| ०२ | प्रस्तावना, कामाचे स्वरुप व व्याप्ती | ०५-०६ |
| ०३ | निविदा कालावधी, निविदा शुल्क, बयाना रक्कम | ०७ |
| ०४ | निविदाधारकांसाठी सूचना | ०८ |
| ०५ | किमान वेतन दर, कर्मचारी भविष्य निधी, ESIC व विमा पॉलीसीबाबत अटी-शर्ती | ०९-१० |
| ०६ | अन्न सुरक्षा मानके कायदा- २००६ आणि नियम २०११ व ISO 22000-2005 चे नियम - | ११ |
| ०७ | कार्य कंत्राट रद्द करणे / काढुन टाकणे व दंडात्मक कारवाईबाबत तरतुद व बील आदा करण्याची पध्दती | १२ |
| ०८ | सर्व साधारण अटी - शर्ती | १३-१५ |
| ०९ | निविदेतील तांत्रीक कागदपत्रे (Technical Documents) | १६ |
| १० | निविदाधारकाबाबत माहीती व बॅक तपशिल | १७ |
| ११ | निविदाधारकाने द्यावयाचे बंधपत्र | १८ |
| १२ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व ESIC बाबत पुर्तता (परिशिष्ट - अ) | १९ |
| १३ | निविदाधारकाने भरुन द्यावयाचे दरपत्रक (परिशिष्ट - ब - BOQ I) | २० |
| १४ | वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र (परिशिष्ट - क ) | २१ |

*निविदा मुल्य रु.२०,०००/-*

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)


शिरडी - ४२३१०९

तालुका – राहाता, जिल्हा – अहमदनगर

---

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग २५८८५३, २५८८४८

फॅक्स क्रमांक – ०२४२३- २५८८७०

Website – www.sai.org.in Email – १) Saibaba@sai.org.in २) laddu@sai.org.in

---

**मुंबई कार्यालय** – साईनिकेतन, ८०४ बी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई -४०००१४, दुरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


---

# सन २०२४-२५

## (माहे एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ अखेर)

**श्री साईबाबा संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी प्रसाद उक्त्या मजुरी दराने तयार करणे, उत्पादनाची तारीख व किंमत इत्यादींच्या शिक्क्यांसह मागणीप्रमाणे लाडू पाकीटे पॅकींग करुन देणे व संस्थानचे उत्सव कालावधीत मिष्टान्न तयार करुन देणेबाबतची ई- निविदा.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
पोस्ट- शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर, पीन कोड - ४२३१०९
*फोन नं. (०२४२३) २५८५०० / २५८८५३ फॅक्स नं. २५८८७०*
*(Website -www.shrisaibabasansthan.org, www.sai.org.in)*

---

## जाहीर ई – निविदा नोटीस

श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरिता सन २०२४-२५ करीता (दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५) या कालावधीसाठी मोतीचुर बुंदी लाडु व बर्फी उक्त्या मजुरी दराने तयार करुन देणे, लाडु पाकीटांवर उत्पादन तारखेची शिक्के मारणे व संस्थानचे मागणीप्रमाणे लाडु पाकीटांची पॅकींग करुन देणे इ. कामांसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | कामाचा तपशिल | कामाचे वार्षिक अंदाजे मुल्य रु. | ई-निविदा शुल्क रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मोतीचुर बुंदी लाडु व बर्फी उक्ते मजुरी दराने तयार करुन देणे, लाडु पाकीटांवर उत्पादन तारखेची शिक्के मारणे व संस्थान प्रशासनाचे मागणीप्रमाणे लाडु पाकीटे / बॉक्सची पॅकींग करुन देणे. | **2.20 कोटी** | **20,000/-** | **2,00,000/-** |
| २ | बर्फी तयार करुन देणे. | **2.00 लाख** | | |
| | **अंदाजे एकुण मुल्य रक्कम रुपये** | **2.22 कोटी** | | |

१. निविदेबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती www.mahatenders.gov.in व www.sai.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
२. निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी.
३. यशस्वी निविदाधारकास कामाचे एकुण मुल्याच्या **3%** इतकी रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणुन बिनव्याजी जमा करावी लागेल.
४. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी **दि.26/02/2024 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून ते दि.14/03/2024 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** उपलब्ध राहतील.
५. सदर कामांबाबत प्री-बीड मिटींग संस्थानचे लेंडीबागेतील श्री साई सभागृह येथे **दि.06/03/2024** रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित करणेत येईल.
६. ई-निविदेतील तांत्रिक कागदपत्रांच्या तपशीलप्रमाणे सर्व वैध कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.
७. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये केवळ Online सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करणेत येईल. तथापि, यशस्वी निविदाकाराने सदर वैध कागदपत्रांच्या मुळ प्रती ई-निविदेसह पुढील १५ दिवसांचे आत संस्थान प्रशासनाकडे सादर करावेत.
८. तांत्रिक निविदा शक्य झाल्यास **दि.16/03/2024** रोजी उघडण्यात येतील.
९. कोणतीही निविदा अंशतः / पुर्णपणे स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

*स्वाक्षरींत /- XXXX*
(तुकाराम हुलवळे)
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

# मराठी वृत्तपत्रात द्यावयाची जाहिरात

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
पोस्ट – शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर, पीन कोड - ४२३१०९
*फोन नं. (०२४२३) २५८५०० / २५८८५३ फॅक्स नं. २५८८७०*
*(Website -www.shrisaibabasansthan.org, www.sai.org.in*

---

## ई -निविदा सुचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरिता सन २०२४-२५ करीता (कालावधी - दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ अखेर) मोतीचुर बुंदी लाडु व बर्फी उक्ते मजुरी दराने तयार करुन देणे, लाडु पाकीटांवर उत्पादन तारखेची शिक्के मारणे व संस्थान प्रशासनाचे मागणीप्रमाणे लाडु पाकीटांची पॅकींग करुन देणे इ. कामांसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदेबाबत कामाचे स्वरुप, निकष, अटी - शर्ती व ई- निविदेच्या माहितीसाठी www.sai.org.in / tender व www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी **दिनांक २६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक १४/०३/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** www.mahatenders.gov.in उपलब्ध राहतील.

*स्वाक्षरींत /- XXXX*
(तुकाराम हुलवळे)
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

A) **निविदेचा तपशिल** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरिता सन २०२४-२५ करीता (कालावधी - दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ अखेर) मोतीचुर बुंदी लाडु व बर्फी उक्ते मजुरी दराने तयार करुन देणे, लाडु पाकीटांवर उत्पादन तारखेची शिक्के मारणे व संस्थानचे मागणीप्रमाणे लाडु पाकीटांची पॅकींग करुन देणे व संस्थानचे उत्सव कालावधीत मिष्टान्न तयार करुन देणेबाबत ई-निविदा

B) **कामाचे स्वरुप -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे उक्त्या मजुरी दराने करावयाच्या कामांचे स्वरुप खालीलप्रमाणे –

**कंत्राटाचा कालावधी** - दि.०१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ अखेर

**अ) अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे मोतीचुर बुंदी लाडू उक्त्या मजुरी दराने तयार करुन देणे, लाडू पाकीटांवर उत्पादन तारीख व किंमत इ.चे शिक्के मारुन संस्थान प्रशासनाचे मागणीप्रमाणे लाडू पाकीटे / बॉक्सची पॅकींग करुन देणे.**

**ब) श्री साईप्रसादालयाचे भोजनामध्ये मिष्टान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी तयार करुन देणे.**

**क) उपरोक्त कामांव्यतिरिक्त संस्थानमार्फत साज-या होणा-या सर्व उत्सवातील** *(श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, दसरा (साधारणतः ०३ ते ०४ दिवस)* **दिवसात श्री साई प्रसादालयामध्ये संस्थानने ठरविलेल्या मेनूनुसार अंदाजे ८० ते ९० हजार साईभक्तांचे भोजनातील मिष्टान्नाचे पदार्थ, चिवडा व बुंदी इ. कंत्राटदाराने तयार करुन देणे.**

*उत्सव काळातील मिष्टान्नासाठी आवश्यक असणारा कच्चा माल, साहित्य व इंधन इ. श्री साई प्रसादालयाकडून पुरविले जाईल,*

## C) कामाची व्याप्ती (Scope of Work) -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे उक्त्या मजुरी दराने करावयाच्या कामांची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील.

१) मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (उदा. हरभरा दाळ, साखर, गाईचे शुध्द (गावरान) तूप, काजू, खिसमिस, हिरवी विलायची, दुध, पेपर पिशवी, पुठ्ठा बॉक्स, इंधन, वीज, पाणी. दाळ दळणेकामी गिरणी इ.) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन पुरविण्यात येईल. सदर कच्च्या मालाची वाहतूक ठेकेदारास स्वत: चे कामगारांकडुन संस्थान वाहनाने संस्थानचे मुख्य भांडार / उपभांडारमधून करुन घेणे.

२) बेसन पीठ भिजवतांना स्वच्छ पाणी वापरण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील, त्यासाठी नळी / बादलीचा वापर करणे कंत्राटदाराचे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

३) कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांवर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

४) मोतीचुर बुंदी लाडु तयार करणेकामी वापरण्यात येणारा साखरेचा पाक तयार करणे / चाचणी घेणे इ.साठी अनुभवी आचा-यांची नेमणुक करणे. तसेच हवामानाच्या बदलांनुसार किंवा ऋुतुमानानुसार अथवा बदलत्या रेसीपीनुसार चाचणीत बदल करणे.

५) संस्थानकडुन वेळोवेळी होणा-या रेसीपीजच्या बदलांनुसार, ठेकेदारांस निविदेत मंजूर झालेल्या दराने व विभागाचे मागणीप्रमाणे अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे मोतीचुर लाडू तयार करुन उत्पादन तारीख व किंमत इ.च्या शिक्क्यांसह लाडू पाकीटे / बॉक्स पॅकींग करुन पुरवठा करणे.

६) पॅकींग व शिक्के मारणेकामी वापरण्यात येणारी उपकरणे *(उदा.हिटींग पट्टया, रबरी शिक्के, स्टॅम्प पॅड, निळी शाई बॉटल्स व इतर आवश्यक साहित्य)* कंत्राटदाराने स्वत: स्वखर्चाने आणणे.

७) साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात मोतीचुर लाडू प्रसादाचे मागणीप्रमाणे दररोज सरासरी ५० ते ६० हजार पाकीटे व गर्दीचे काळात दैनंदिन ८० ते ९० हजारापर्यंत लाडू प्रसाद पाकिटांवर तारखेचे शिक्के मारु**न** पॅकींग करुन देणे.

८) मान्यवर साईभक्तांना विक्रीसाठी विभागाचे दैनंदिन मागणीनुसार पाकीटे /बॉक्स पॅकींग करुन तारखेचे शिक्के मारुन देणे.

९) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास दैंनदिन २५ - ३० क्विंटल तर गर्दीमध्ये ३०-३५ क्विंटलच्या लाडु प्रसादाची आवश्यकता असल्याने त्यासाठी आवश्यक तेवढया कर्मचा-यांची नेमणुक करणे.

१०) श्री साई प्रसादालयामधील भोजनात मिष्टान्न म्हणुन देण्यात येणारी रवा / बेसन बर्फी प्रसादालय विभागाचे मागणीनुसार व आवश्यकतेप्रमाणे तयार करुन देणे. तसेच बर्फी प्रसाद तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (उदा. साखर, तूप, रवा / बेसन, इंधन व पाणी व इतर) श्री साई प्रसादालयाकडून मागणीप्रमाणे पुरविण्यात येईल.

**D) ई –निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशिल खालीलप्रमाणे –**

१) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या नावाने अन्न औषध प्रशासन यांचा चालु वर्षाचा वैध केटरींग परवान्याची प्रत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

२) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या फर्मच्या नावाने वैध लेबर लायसन्स, स्वतंत्र पी.एफ कोड ड्राप्ट लेटरची सत्यप्रत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

३) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या फर्मचा कर्मचारी विमा राज्य महामंडळ (Employee’s State Insurance Corporation) यांचा ESIC कोड लेटरची सत्यप्रत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

५) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

६) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या फर्मची सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या ०३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रु.५० लाख मात्र किंवा त्यापेक्षा अधिक असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए. यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

७) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या फर्मला /संस्थेला कोणत्याही संस्थान /शासकीय / निमशासकीय/ खाजगी स्वराज्य संस्था यांनी काळया यादीत समाविष्ट केले नसल्याचे रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लेखी प्रतिज्ञापत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

८) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे, त्या फर्मने मागील ०३ वर्षाचे आयकर (Income Tax Returns) भरल्याचे दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

**E) पुरवठा करावयाच्या कामांचा तपशिल, निविदा कालावधी, निविदा शुल्क, बयाना रक्कम -**

१) सदर निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतीम दिनांकापासुन १२० दिवसांचा राहील.

२) मोतीचुर बुंदी लाडू तयार करुन पाकीटे / बॉक्सवर उत्पादन तारीख व किंमत इ.चे शिक्के मारुन पॅकिंग करणे, बर्फी प्रसाद तयार करुन देणे व उत्सव कालावधीत मिष्टान्न तयार करुन देणे इ. कामांचा कालावधी कार्यादेश मिळालेपासून ०१ वर्षासाठी राहील.

३) निविदेसोबत नियमाप्रमाणे बयाणा रक्कम रु.2,00,000/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) व निविदा शुल्क रु. 20,000/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र) शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर जमा करुन त्याची भरणा पावती सोबत ऑनलाईन जोडावी. निविदा शुल्कासाठी भरलेली रक्कम रु.20,000/- परत केली जाणार नाही.

४) MSME अंतर्गत निविदा फी व बयाना रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाना रक्कम भरणे अनिवार्य आहे.

**F) सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा –**

१) शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांची निविदा मंजुर होईल, अशा यशस्वी निविदाधारकाला कामाची हमी म्हणून एकुण कामाच्या मूल्याच्या 3% इतकी अनामत रक्कम निविदा स्विकृतीचे पत्र मिळालेपासून १५ दिवसांचे आत संस्थान खाती किंवा लेखाशाखेत जमा करावी लागेल. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही, मागता येणार नाही.

२) निविदाधारकाने संस्थानकडे भरलेली सुरक्षा अनामत रक्कम ही कंत्राट कालावधी समाधानकारक पूर्ण केल्यानंतर परत केली जाईल.

२) ठेकेदाराने निविदा स्विकृतीचे पत्र दिल्यानंतर ०१ महिन्यांचे आत स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा / नोटरी करुन देणे बंधनकारक राहील.

३) सदर प्रकरणी करावयाचा करारनामा / नोटरी नोंदणीकृत करणेसाठी येणारा खर्च कंत्राटदारास स्वतः करावा लागेल. सदर पुर्तता विहीत मुदतीत करारनामा न केल्यास त्यापुढील तारखेपासून प्रतीदिनी रु.१,०००/- दंड मासिक बिलातुन कपात करणेत येईल.

**G) निविदाधारकांसाठी सुचना –**

१. शासनाचे www.mahatenders.gov.in अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या अटीं-शर्ती पुर्णतः वाचुनच निविदा भरावी.

२. सदर कामांबाबतची निविदा दि.26/02/2024 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून दि.14/06/2024 सायं.05.00 वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड व डाऊनलोंडीगसाठी उपलब्ध राहील.

३. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये केवळ Online सादर केलेली कागदपत्रे ग्राह्य धरणेत येतील, त्यामुळे Hard Copies संस्थानचे कार्यालयास जमा करणेत येणार नाहीत / स्विकारली जाणार नाहीत.

४. शक्य झाल्यास दि.16/03/2024 रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रीक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करतांना निविदाधारकांनी आपले संपर्क क्रमांक ऑनलाईन निविदेमधील तक्त्यात नमूद करावेत, म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. निविदा अशंतः/ पुर्णतः स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे, त्याबाबत कारणे देणे संस्थान प्रशासनास बंधनकारक राहणार नाही.

७. ऑनलाईन निविदा सादर केल्यानंतर निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास संपुर्ण बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल, त्याची निविदाकारास मागणी करता येणार नाही.

८. निविदा ज्या फर्मच्या / व्यक्तीच्या नावाने असेल त्याच नावाने सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भिन्नता/तफावत आढळुन आल्यास सदर निविदा अनाधिकृत समजून बाद ठरविण्यात येईल, त्याबद्दल निविदाधारकास तक्रार करण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

९. कंत्राटदार / निविदाधारक यांची निविदा मंजूर झालेनंतर सदर कामाचा ठेका इतर उपकंत्राटदारास देता येणार नाही / त्याची नेमणुक करता येणार नाही.

१०. मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकिंग करुन व उत्सव कालावधीमध्ये मिष्टान्न तयार करुन देणेबाबतचा संपूर्ण तपशिल उपरोक्त प्रस्तावनेत दिलेला आहे, त्यानुसार सदर कामांसाठी उक्ते मजुरी दर देतांना GST वगळुन द्यावेत. तसेच लागु असलेले इतर कर स्वतंत्र दाखवावेत.

११.निविदाधारकाने निविदा मंजुर झाल्यानंतर काही कारणास्तव कंत्राट घेण्यास नकार दिल्यास / टाळाटाळ केल्यास / हलगर्जीपणा केल्यास निविदेसाठी भरण्यात आलेली निविदेची बयाना (EMD) / सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करुन घेणेत येईल व सदर ठेकेदारास काळया यादीत टाकण्याची अगर संस्थान व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उचीत कारवाई करण्यात येईल.

**H) निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमुद करणे –**

१) निविदाधारकांनी Online BOQ ***(परिशिष्ट "ब")*** मध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीस कर तसेच किमान वेतन दरवाढ, उत्सव खर्च, पॅकींग खर्च, व शाई - शिक्के या सर्व बाबींचा विचार करुनच दर भरावेत.

२) सदर उक्त्या मजुरी कामाच्या बीलांवरील सरकारमान्य GST संस्थान प्रशासनाकडुन ठेकेदारांस आदा केला जाईल. सदरचा कर (GST) ठेकेदाराने सरकारला भरुन त्याची चलने / पावती पुढील महिन्यांचे बिलासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

३) शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने ०१ ऑक्टोंबर २०१८ पासुन करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत निर्देशित केले आहे. याबाबत अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) कंत्राट कालावधी संपेपर्यंत मंजूर दरांमध्ये कोणतीही दरवाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही.

५) निविदाधारकाने निविदा भरण्यापुर्वी प्रत्यक्षात कामाचे स्वरुप, व्याप्ती लाडू व बुंदी तयार करण्याचे दैनंदिन परिमाण, उत्सव कालावधीत तयार करावयाचे मिष्टान्न परिमाण व दिवस या सर्व बाबींची माहिती करुन घेऊन मगच निविदा भरावी.

**I) किमान वेतन दर, कर्मचारी भविष्य निधी, ESIC योजना व विमा पॉलीसीबाबत अटी-शर्ती -**

१. कंत्राटदारास त्यांचेकडील कुशल, अकुशल कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाचे शॉप अॅन्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०२ प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतन दर, महाराष्ट्र शासनाकडुन वेळोवेळी देय्य होणारे स्पेशल अलौन्ससह अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह वेतन देणे बंधनकारक राहील किंवा किमान वेतन दरात वेळोवेळी होणा-या बदलांनुसार वेतन देणे बंधनकारक राहील. त्याबाबत संस्थानकडुन वाढीव मोबदला मागता येणार नाही.

२. कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कामगारांचे वेतन प्रत्येक महिन्याचे १० तारखेचे आत बॅंक अकाऊंट पध्दतीने प्रत्येक कामगारांच्या बॅंक खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील, त्यासाठी कंत्राटदारास संस्थानकडुन बीलाची रक्कम आदा केली जाण्याची वाट पाहता येणार नाही. कंत्राटदाराने कामगारांचे वेतन १० तारखेपर्यंत न केल्यास त्यानंतरच्या विलंबासाठी म्हणजेच ११ तारखेपासुन प्रतिदिन किमान रुपये १०००/- मात्र इतका दंड आकारला जाईल व दंडाची रक्कम पुढील महिन्यांचे देयकांमधुन वसुल केली जाईल.

३. कंत्राटदारामार्फत नेमणुक करणेत आलेल्या कामगारांचे दैनंदिन आगमन-निर्गमनावर नियंत्रण ठेवणेसाठी स्वखर्चाने बायोमेट्रीक अॅटेंडन्स सिस्टीम बसविणे कंत्राटदारवर बंधनकारक राहील.

४. सदर कामासाठी लावण्यात येणा-या कंत्राटी कामगारांचे बाबतीत कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ (Workmen Compensation Act वर्कमॅन कॉम्पेन्सेशन अॅक्ट १९२३) नुसार कंत्राटी कामगारास नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास सदर नुकसान भरपाईची रक्कम भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ (प्रॉव्हीडंट फंड अॅक्ट १९५२ नुसार भरावी लागणारी अंशदानाची रक्कम प्रशासकिय चार्जेससह तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावे लागणारे किमान वेतन दर तसेच पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट १९६९ नुसार कंत्राटी कामगारांना विहीत मुदतीत वेतन अदा करणे इ. बाबींची कायदेशीर जबाबदारी ही कंत्राटदारावर बंधनकारक राहील त्याची तोशीस संस्थानला लागता कामा नये.

५. कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीतील (PF) कर्मचारी हिस्सा १२% व मालकाचा हिस्सा १३% (प्रशासकीय चार्जेसह) अशा एकुण २५% भविष्य निर्वाह निधी रकमेचा विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करुन, दरमहा वेतन बॅंकेत जमा केलेबाबतची बॅंक यादीची पोहोच व भविष्य निर्वाह निधी (PF) व ESIC इ. ची रक्कम भरणा केलेच्या पावत्या / चलने संस्थान प्रशासन कार्यासन १०-अ कडे सादर करावी लागेल, याबाबत संस्थानची दिशाभुल केल्यास कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याचे कार्यकंत्राट रद्द करुन व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून, कंत्राटदारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल, अथवा मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेत येईल.

६. कंत्राटदाराने त्यांचे कर्मचा-यांना वेतन आदा केलेबाबत सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर व तशी संस्थान प्रशासनाची खात्री झालेनंतरच पुढील ३० दिवसांचे आत केलेल्या कामाचे बील आदा करण्याचा संस्थान प्रशासनाचा प्रयत्न राहील.

७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.४७/ विमा प्रशासन परिपत्रकानुसार सदर कामासाठी लावलेल्या कामगारांचा **अपघाती विमा** उतरविणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील व सदर विमा पॉलीसीची प्रत कार्यादेश मिळालेपासुन ०१ महिन्याचे आत संस्थान प्रशासनाकडे सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

८. कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे (Employees' State Insurance Corporation) **ESIC** योजनेतील तरतुदीनुसार सर्व कामगारांचे रजिस्ट्रेशन करुन कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कंत्राटदाराने स्वतः भरावयाचा आहे. व प्रत्येक महिन्यांचे रकमेचा भरणा करुन त्याची चलने / कागदपत्रे संस्थानच्या प्रशासन शाखा कार्यासन १०-अ कडे पुढील महिन्यांचे बीलासोबत सादर करणेची जबाबदारी कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

९. सदर कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांसंबंधी कंत्राटी कामगार नियम व निर्मुलन अधिनियम १९७० नुसार ठेवावे लागणारे हजेरी रजिस्टर, वेतन रजिस्टर व इतर संबंधीत सर्व रेकॉर्ड व

दस्तऐवज विहीत नमुन्यात ठेवण्याची व त्यासंबंधी सर्व कायदेशीर पुर्तता करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०. मासिक बिले सादर करतांना बिलात कार्यादेशातील वर्णनाप्रमाणेच संपुर्ण तपशिल असणे आवश्यक राहील, संक्षिप्त स्वरुपात असलेली बिले ग्राह्य धरली जाणार नाहीत / आदा केली जाणार नाहीत.

११. कंत्राटदारामार्फत पुरविलेले कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्य वर्तन केल्यास, संस्थानचे मिळकतीस इजा/हानी पोहचविल्यास त्याबाबतची संपुर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

**J) अन्न सुरक्षा मानके कायदा- २००६ आणि नियम २०११ व ISO 22000-2005 चे नियम -**

१. मा.अन्न सुरक्षा मानके प्राधिकरण, महाराष्ट्र शासन यांचे नियमामध्ये वेळोवेळी होणारे बदल (रुल्स ॲन्ड रेग्युलेशन) कंत्राटदारावर बंधनकारक राहतील व त्यांचे निर्देशाप्रमाणे कामगारांचे आरोग्य / स्वच्छता, कामाचे ठिकाणी धुम्रपान व मद्यपान इत्यादी करणेस सक्त मनाई आहे याची विशेष काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे, तसे आढळुन आल्यास कंत्राटदारावर **रु.५००/-** प्रती कामगार याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२. सदरचे कामासाठी लावणेत येणा-या प्रत्येक कामगारांची वैदयकिय तपासणी दर ०३ महिन्यांनी संस्थानचे रुग्णालयात निशुल्क करण्यात येईल. यासाठी ठेकेदाराने संस्थानने ठरवून दिलेल्या वेळेत विभागप्रमुख यांचे पत्र घेऊन, प्रत्येक कर्मचा-यांची दर ०३ महिन्यांनी वैदयकिय तपासणी करुन, तपासणी अहवाल लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास सादर करणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील. संसर्गजन्य आजार किंवा त्वचारोग झालेल्या कर्मचा-यांकडुन सदरची कामे करुन घेता येणार नाही. त्यामुळे अशा कर्मचा-यांची नेमणूक करु नये.

३. अन्न सुरक्षा मानके कायदा- २००६ आणि नियम २०११ व ISO22000-2005 चे नियमानुसार स्त्री कामगार यांना डयुटीचे वेळेत (गळयातील मंगळसुत्र वगळता) अंगठी, नेलपेंट, बांगडी, कानातील भुषणे तसेच पुरुष कामगारांना हातातील कडे, धागे, अंगठी इ. वस्तु वापरणेस प्रतिबंध राहील. पुरुष कामगारांना कामाचे ठिकाणी येतांना डोक्याची केस कापुन येणे, दाढी करणे, हाताची नखे कापणे इ. सर्व कर्मचा-यांवर बंधनकारक राहील. कामावर असलेल्या सर्व कर्मचा-यांची वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

४. कंत्राटदारांकडील कंत्राटी कामगारांना गणवेश, ओळखपत्र, चप्पल/ गमबुट, ॲप्रॉन, टोपी, मास्क हातमोजे इ. कंत्राटदारांस स्व-खर्चाने पुरवावे लागतील व त्यांचा वापर करणेची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

**K) कार्य कंत्राट रद्द करणे / काढुन टाकणे व दंडात्मक कारवाईबाबत तरतुद –**

१. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागप्रमुख अगर कार्यालयातील कर्मचारी यांचे सुचनेप्रमाणे मालाचे परिमाण वापरुन आवश्यकतेनुसार तयार करुन द्यावी लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद

उपस्थित होणार नाही, अशाप्रकारे आपलेकडील कर्मचा-यांचे वर्तन ठेवावे. वरिष्ठांसोबत उध्दटपणे, अर्वाच्य भाषेत बोलणे अगर मोठा वाद उद्भवल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरुन कंत्राट रद्द करणेचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

२. मोतीचुर लाडू व बर्फी प्रसाद बनविणेच्या कामात, गुणवत्तेस निविदाधारक अपयशी ठरले अथवा गर्दीच्या प्रमाणात पुरेसे मनुष्यबळ वापरुन मोतीचुर लाडु व बर्फी प्रसाद पुरविण्यात असमर्थ ठरल्यास एकुण मासीक कामाच्या बीलाचे ५% पर्यंतची दंडात्मक कारवाई करणेत येईल.

३. बीलातुन कपात केलेली दंडाची रक्कम परत मागण्याचा अधिकार कंत्राटदारास राहणार नाही. तसेच अशा स्वरुपाच्या तक्रारी वारंवार आल्यास कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना न देता काळया यादीत (Black List) मध्ये समाविष्ट करणेत येऊन, संपुर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल, अगर मा.तदर्थ/व्यवस्थापन समित / मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील, त्याप्रमाणे उचीत कार्यवाही करणेत येईल.

४. निविदेतील, करानाम्यातील व कार्यादेशातील सर्व अटी – शर्तींचे पालन करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. निविदेतील, करानाम्यातील व कार्यादेशातील एक किंवा अनेक अटी-शर्तीचे उल्लंघन झाल्यास, कंत्राटदाराचे कार्यकंत्राट रद्द करुन, संपुर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल व कंत्राटदारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेची कार्यवाही संस्थान प्रशासनाकडुन करणेत येईल. अगर मा.तदर्थ/व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील, त्याप्रमाणे उचीत कार्यवाही करणेत येईल.

**L) बील आदा करण्याची पध्दती –**

१) तयार लाडू तसेच बर्फी प्रसाद याची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करण्यात येईल, बीलापोटी कंत्राटदारास आगाऊ रकमेची मागणी करता येणार नाही.

२) तयार करुन ताब्यात घेतलेल्या मालाचे बील संस्थानकडे सादर केलेपासुन ३० दिवसांचे आत संबंधित कंत्राटदाराचे बॅंक खात्यावर आदा करण्याचा प्रयत्न राहील.

३) शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातुन करण्यात येतील.

**M) सर्व साधारण अटी - शर्ती**

१) कंत्राटदारामार्फत काम करु इच्छिणारे कंत्राटी कर्मचारी भाविक वृत्तीचे असावेत, उध्दटपणा/ बेशिस्तपणा/गैरशिस्त वर्तन करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना तात्काळ विनानोटीस/विना नुकसान भरपाई कामावरुन बंद करणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील. तथापि, उध्दटपणा / बेशिस्तपणा / गैरशिस्त वर्तन असे प्रकार वारंवार कामाचे ठिकाणी घडल्यास विना नोटीस कंत्राटदाराचे कार्य कंत्राट रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

२) संस्थानकडे काम सुरु केलेनंतर या ठिकाणी काम करुन घेणेसाठी आवश्यक वैध लेबर लायसन्सची प्रत व अहमदनगर जिल्हयात काम करत असलेबाबत कामगार आयुक्त – अहमदनगर यांचे परवान्याची प्रत (Form 5A) निविदा मंजुर झालेनंतर ०१ महिन्यांचे आत संस्थान प्रशासनास सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

३) संस्थानकडुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश मिळालेपासुन ०२ महिन्यांचे आत कंपनी / संस्थेने उत्तम दर्जाचे प्रशिक्षक नेमुन त्यांचेमार्फत लाडु व बर्फी तयार करणा-या कर्मचा-यांना अन्न सुरक्षा व वैयक्तिक स्वच्छतेबाबत प्रशिक्षण (Training) देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास प्रतीमहीना रु.५००/- मात्रचा दंड कंत्राटदाराचे मासिक बिलातुन कपात / वसुल केला जाईल.

४) गर्दीचे व उत्सव काळात मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी तयार करणे, मागणीप्रमाणे पॅकींग करुन देणे इ. कामांसाठी संस्थान प्रशासन व वरिष्ठांचे सुचनांनुसार अतिरिक्त आचारी / कर्मचा-यांची नेमणुक करुन मालाचा पुरवठा करुन देणे ठेकेदारांस बंधनकारक राहील, तसे न झाल्यास ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.

५) कर्मचा-यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे (जसे – केस कापणे, दाढी, नखे, शारीरिक इजा / दुखापत, त्वचेचे आजार, स्वच्छ गणवेश इ.) लक्ष ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्यासाठी स्वतंत्र रजिस्टरमध्ये दैनंदिन नोंदी ठेवणे व विभागप्रमुख मागणी करतील त्यावेळी रजिस्टर सादर करणे बंधनकारक राहील.

६) लाडू पॅकींग कक्षात कर्मचा-यांना वापरावयाचे चप्पल / गमबुट, ॲप्रॉन, टोपी, मास्क हातमोजे इ. कंत्राटदारांस स्व-खर्चाने पुरवावे लागतील व त्याचा वापर करुन घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

७) किचनमधील सर्व साफसफाई व स्वच्छतेची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराकडील कर्मचा-यांची राहील, याबाबत कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. किचनमध्ये अस्वच्छता आढळल्यास ठेकेदारास देय असलेल्या मासिक बिलाचे एकुण रकमेतुन २% पर्यंत दंडाची रक्कम ताबडतोब बिलातुन वसुल करणेत येईल.

८) भविष्यात संस्थान प्रशासनाकडे लाडु तयार अथवा पॅकींग करण्याचे स्वयंचलीत मशिनरी उपलब्ध झाल्यास, मशिनरीव्दारे लाडू व बुंदी तयार करुन पॅकींग करणे इ. कामाचे दर स्वतंत्ररित्या मागविणेत येतील. तथापि, दरम्यानचे कालावधीत मशिनरीव्दारे बुंदी लाडू प्रसाद तयार करण्याचे काम सुरळीत होईपर्यंत लाडू, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन देणेची जबाबदारी आपली राहील.

९) लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी लागणारे सर्व आवश्यक साहीत्य (उदा. कौचे, झारे, बुंदी काढणेसाठी पाट्या, स्टिल मग, बुंदी सुकविणेकामी व बर्फी बनवितांना ट्रे मधुन बर्फी खाली टाकणेकामी चांगल्या प्रतीचा प्लास्टीक कागद/ताडपत्री इ.) कंत्राटदाराने स्वखर्चाने आणून वापरावयाची आहेत. तसेच किचनमधुन तसेच उपभांडारमधुन माल ने-आण करणेसाठी लागणा-या हायड्रोलिक गाडया संस्थानकडून पुरविल्या जातील मात्र सदरच्या गाडया खराब झाल्यास / तुटल्यास / नादुरूस्त झाल्यास अगर नविन स्पेअर पार्ट बदलल्यास सदर स्पेअर पार्टची किंमत / नुकसान भरपाईची रक्कम ठेकेदाराचे देय होणा-या बिल रकमेतुन वसुल करणेत येईल.

१०.संस्थान प्रशासनाकडुन लाडू प्रसादाचा दर्जा व गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी वेळोवेळी करण्यात येणारे बदल / रेसीपीजनुसार व संस्थानचे मागणीनुसार लाडुची पाकीटे / बॉक्स पॅकींग करुन द्यावी लागतील, त्यासाठी ठेकेदाराने निविदेत दिलेल्या न्युनतम दरांव्यतिरिक्त कुठलीही दरवाढीची मागणी करता येणार नाही.

११.कंत्राटदाराचे कामाची प्रत (गुणवत्ता) समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास किंवा मोतीचुर बुंदी लाडू व बर्फीचा पुरवठा संस्थानचे मागणीप्रमाणे न झाल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून इतर कंत्राटदाराकडून बाजारभावाने आवश्यक तेवढे मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी तयार करण्यात येऊन त्यासाठीच्या जादा लागलेल्या फरकाची खर्ची झालेली रक्कम सुरक्षा अनामत रकमेतून किंवा पुढील देयकांमधुन प्रतिपुर्ती करण्यात येईल.

१२.कोणत्याही प्रकारे पदार्थ खराब झाल्यास / नासधुस झाल्यास त्याची नुकसान भरपाई होणारी रक्कम कंत्राटदाराचे दरमहा देय असणा-या रकमेतुन / बीलातुन वसुल केली जाईल. त्यासाठी अनुभवी व तज्ञ शक्यतो राजस्थानी आचारी / व्यक्तींची नेमणुक करणे कंत्राटदारावर बंधकारक राहील.

१३.सदर काम उक्त्या मजुरी पध्दतीचे असल्याने कंत्राटदारांकडून कामास लावणेत आलेले कामगार व त्यांचे  सेवक संस्थान सेवेकरीता आग्रह धरु शकणार नाहीत / पात्र असणार नाहीत. तसेच कंत्राटदाराने लावलेल्या कामगारांचा संस्थानशी कोणत्याही प्रकारे मालक - नोकर असा कायदेशीर संबंध राहणार नाही. अथवा कंत्राटदार व त्यांचे कामगार यांच्यात काही वाद उपस्थित झाल्यास तो कंत्राटदाराने स्वतः सोडवायचा आहे, त्याची कोणतीही जबाबदारी संस्थानवर असणार नाही.

१४.कार्यकंत्राटाचा कालावधी संपलेनंतर पुढील कालावधीकरीता नविन ठेकेदाराची निवड करणेकामी / ई-निविदा प्रक्रीयेचे कार्यवाहीसाठी अवधी लागत असल्यास व सदर कालावधीसाठी संस्थानने मुदतवाढ दिल्यास, आहे त्याच पुर्वीच्या मंजूर दराने नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपावेतो किंवा ०३ महिने यापैकी जी कार्यवाही अगोदर होईल तोपर्यंत कंत्राटदारास काम करावे लागेल, याबाबत कोणतीही दरवाढ दिली जाणार नाही / मागणी करता येणार नाही.

१५.कंत्राटदारांस कोणत्याही कारणाकरीता आगाऊ (ॲडव्हान्स) रकमेची मागणी करता येणार नाही.

१६.नैसर्गिक आपत्ती, महामारी यामुळे जर मंदिर बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीमध्ये निविदेमध्ये नमुद केलेल्या कामाचे अंदाजे किंमतीएवढे काम देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. तसेच लाडू व बर्फी प्रसाद तयार करण्याचे काम सर्वस्वी साईभक्तांच्या संख्येवर अवलंबुन असल्यामुळे ई-निविदेमध्ये दर्शविलेल्या अंदाजे किंमतीपेक्षा कमी किंवा जास्त मालाची गरज भासू शकेल, त्यामुळे निविदेमध्ये नमुद केलेल्या कामाचे अंदाजे किंमतीएवढे काम देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१७.**लाडु व बर्फीसाठी निविदा दर मागवितांना जर बर्फी आणि लाडुसाठी वेगवेगळे कंत्राटदार एल-०१ येत असतील तर, बर्फीचे एल-०१ निविदाधारकाला बर्फीचे काम स्वतंत्रपणे देण्याचा अधिकार संस्थानने राखुन ठेवलेला आहे.**

१८.सदर कार्यकंत्राट / व्यवहाराबाबत काही वाद- विवाद उपस्थित झाल्यास, ज्यु.सिव्हील डिव्हीजन, राहाता / कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत येत राहील.

१९.कोणतीही निविदा मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा / नाकरण्याचा हक्क श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबत कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

२०.सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करु न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

२१.उपरोक्त अटी-शर्तीत काही बदल सुधारणा करणे अथवा जादा अटी-शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकांच्या कोणतीही अट / अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

*स्वाक्षरींत /- XXXX*

(तुकाराम हुलवळे)

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## ई- निविदेतील तांत्रीक (Technical) कागदपत्रे

१) अन्न औषध प्रशासन यांचेकडील अद्यायवत केटरींग परवाना.

२) वैध लेबर लायसन्सची प्रमाणीत प्रत

३) सनदी लेखापाल यांचे सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र *(**परिशिष्ट "क"** प्रमाणे)*
*(०३ वर्षाची सरासरी उलाढाल रु.५० लाख किंवा त्यापेक्षा जास्त)*

४) पॅन कार्डची प्रमाणीत प्रत

५) जी.एस.टी. (GST) प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत

६) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Provident Fund) प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत

७) ESIC प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत

८) कोणत्याही संस्थान / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था यांच्या काळया यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र.
*(रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर)*

९) मागील ०३ वर्षाचे आयकर भरल्याचे दस्ताऐवज (Income Tax Returns of Previous 03 Years)

## - निविदाधारकाबाबतची माहीती-

**१.** फर्मचे / संस्थेचे नांव ------------------------------------------------------------------

**२.** पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता ------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------

**३.** दुरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------------

कार्यालय- ------------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------------

फॅक्स नंबर – ------------------------------------------------------------------

ई- मेल- ------------------------------------------------------------------

**४.** संपर्कासाठी व्यक्तीचे नांव ------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक ------------------------------------------------------------------

**५.** मालकाचे/भागीदारांची नांवे १ ------------------------------------------------------

२------------------------------------------------------

**६.** **RTGS Details**–

| १. **बॅंक खाते नंबर** | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

२. बॅंकेचे नाव - ------------------------------------------------------------------

३. शाखा – ------------------------------------------------------------------

४. **IFSC CODE -** ५. MICR CODE -

***निविदाधारकाची सही व शिक्का***

***श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचे बंधपत्र.***

---

दिनांक -

**प्रति,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ता.राहाता, जि.अहमदनगर

**विषय- श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०२४-२०२५ करीता (दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ अखेर) उक्त्या मजुरी दराने मोतीचुर बुंदीचे लाडू, तयार करुन मागणीप्रमाणे लाडू पाकीटांवर उत्पादन तारीख व किंमत इ. चे शिक्के मारुन पॅकींग करुन देणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ. कामांची ई – निविदेबाबत...**

मा.महोदय,

मी / आम्ही खालील सही करणार लिहुन देतो / देते की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेल्या निविदेतील सर्व अटी - शर्ती मी / आम्ही वाचल्या असून, सर्व अटी-शर्ती मला / आम्हांला मान्य आहेत. आपले अटी - शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहोत.

मी / आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे मोतीचुर बुंदी लाडु व बर्फी प्रसाद संस्थानव्दारा वेळोवेळी बदल करणेत येणा-या रेसीपीजनुसार उपरोक्त कालावधीत संस्थान प्रशासनाचे आवश्यकतेनुसार, कोणतीही कारणे न देता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांना बनवून उत्पादन तारीख व किंमतीच्या शिक्क्यांसह पॅकिंग करुन देण्याची हमी देतो.

माझी / आमची सादर केलेली उक्त्या दरांची निविदा मंजूर झाल्यास, एक महिन्यांचे आत योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देऊ व निविदा कामाच्या एकुण मुल्याच्या ३% सुरक्षा अनामत पुर्णाकिंत रकमेचा भरणा *(विनाव्याजी)* संस्थानच्या अधिकृत खात्यात अथवा प्रत्यक्ष लेखाशाखेत रोख स्वरुपात जमा करु. विषयांकीत काम **दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ पर्यंत** मंजूर दराने करुन देणे माझेवर / आमच्यावर बंधनकारक राहील, त्यात कसुर झाल्यास होणा-या शिक्षेस मी / आम्ही पात्र राहु असे बंधपत्र देत आहे / आहोत.

आपला / आपली विश्वासू,

फर्म मालक / भागीदारांचे नांवे — सही व शिक्का

(१)

(२)

## परिशिष्ट- "अ"

---

**कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम- १९५२ व ESIC योजनेसाठी करावयाची पुर्तता**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आस्थापनेस कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ लागू असल्याने श्री साईबाबा संस्थान यांचेकडील कंत्राटदारांमार्फत नेमलेल्या कामगारांना देखील हा कायदा लागू होतो, त्यामुळे आपण कामाकरीता नेमलेल्या कामगारांचे पगारपत्रकानुसार होणारी भविष्य निर्वाह निधीची व ESIC योजनेची रक्कम दरमहा वेळेत भरणा करुन आवश्यक ती कागदपत्रे संस्थानचे भविष्य निर्वाह निधी कार्यासनाकडे जमा करणे ही कंत्राटदाराची कायदेशीर जबाबदारी आहे.

***कंत्राटदारास खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहतील.***

१) कामाचे सुरुवातीस कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नुसार मा.सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडून या कामाकरीता घेतलेल्या लेबर लायसेन्सची प्रत अथवा त्याबाबतचे प्रतिज्ञापत्राची प्रत व संस्थान कामाकरीता घेतलेल्या लेबर लायसन्स मधील कर्मचारी संख्येपेक्षा कमी कर्मचारी कामास नेमलेले असतील तर प्रत्यक्षात किती कामगारांची नेमणुक केली आहे याबाबदचे दरमहा पत्र द्यावे लागेल.

२) आपण सदर कामाकरीता नेमलेल्या कर्मचा-यांचे भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाकडील विहीत नमुन्यातील वारसदार फॉर्म भरुन देऊन सदर फॉर्म भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करण्याची जबाबदारी आपली राहील.

३) दरमहा रक्कम भरणा केलेनंतर चलनाची एक मुळ प्रत ऑनलाईन प्रॉ.फंड रजिस्टर, रक्कम जमा केलेले रिमिटन्स स्लीप, हजेरी पत्रक व पगार पत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती (प्रत्येक महीन्याची स्वतंत्रपणे) संबंधीत विभागास सादर कराव्यात.

४) आपणास लाडू निर्मिती विभागाने काम दिलेले असल्याने त्याच्या अहवालावरुन कामाचा कालावधी निश्चीत करण्यात येईल व त्या कालावधीची उपरोक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रत्येक महीन्याचे बीलावर मागील महीन्यातील भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेबाबत अभिप्राय देण्यात येतो, सदरची रक्कम भरणा करुन कागदपत्रे सादर केल्याशिवाय पी.एफ विभागास अभिप्राय देता येत नाही, त्यामुळे कागदपत्रे वेळेत सादर न केलेस आपले बील वेळेत अदा होत नाही.

६) उपरोक्तप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेस कंत्राटदारास विलंब झाल्यामुळे सदर कामाचे बील प्रलंबीत राहीलेस त्याची सर्वस्वी जवाबदारी कंत्राटदारावर राहील.

७) संस्थानकडील कंत्राट संपलेनंतर आपलेकडील कामगारांची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम त्यांना परत मिळवून देणे संबंधीत कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८) कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कर्मचा-यांचे राज्य विमा निगम (ESIC) योजनेबाबत रजिस्ट्रेशन करुन, कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कामगारांचे खात्यावर भरणा करणे व आवश्यक कागदपत्रांची तपशिलवार माहीतीची पुर्तता करुन देणे इ. कंत्राटदारांस बंधनकारक राहील.

## परिशिष्ट - "ब" (BOQ – I)

**दिनांक ----------------------**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने भरुन द्यावयाचे दरपत्रक**
**कंत्राटाचा कालावधी - दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ अखेर**

१. गावरान तुपातील अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे व संस्थान प्रशासनाचे मागणीप्रमाणे उत्पादन तारीख व किंमत इ. चे शिक्के मारुन पाकीटे / बॉक्स पॅकींग करुन देणे. (दर प्रती ०१ क्विंटल साखरेसाठी)
दर रु.----------------------- (अक्षरी रुपये -----------------------------------------------------)

२. वनस्पती तुपातील बर्फी तयार करुन देणे. (दर प्रती ०१ क्विंटल साखरेसाठी)
दर रु. --------------------- (अक्षरी रुपये -----------------------------------------------------)

➢ **टिप – उपरोक्त नमुद केलेले सर्व दर GST सोडुन / वगळुन नमुद करावेत.**
**Note – All Above mentioned rates should be excludable of GST**

*फर्म/ संस्थेचा सही व शिक्का*

**परिशिष्ट - "क"**

**वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र**

*(अधिकृत सनदी लेखापाल यांचे लेटरहेडवर)*

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायांची **सन २०२० – २१, २०२१ - २२ व २०२२ - २३** या आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **वर्ष** | **वार्षिक उलाढाल** (रुपयांत) |
|---|---|---|
| ०१ | सन २०२० - २०२१ | |
| ०२ | सन २०२१ - २०२२ | |
| ०३ | सन २०२२ - २०२३ | |
| **सरासरी वार्षिक उलाढाल (Average)** | | |

**दिनांक :-** / /२०२४
**ठिकाण** –

**सनदी लेखापाल**
***(Chartered Accountant)***
*( नाव / सही व शिक्का )*

नोंदणी क्रमांक -